नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 07/05/2021 (शुक्रवार)
(दुपार)

---

## अवैधरित्या देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई
## एकुण 10,70,560/– रू चा मुद्देमाल जप्त

दिनांक 06/05/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथकचे उवविभाग नागपूर हद्दीत गस्त करित असतांना त्याना गोपनीय माहितगारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलिस ठाणे बुटीबोरी हद्दीत बुटीबोरी ते वर्धा महामार्गावरून एका चार चाकी वाहनाने अवैधरित्या देशी दारू ची वाहतुक होणार आहे. अशा मिळालेल्या माहितीवरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने बुटीबोरी ते वर्धा महामार्गावरून आरोली सावंगी शिवारात गाढवमुखी मंदीर समोर येथे नाकाबंदी करून एमएच–49/बीबी–9415 क्रमांकाची मारुती अरटीगा कारला थांबवुन चेक केले असता त्यामध्ये आरोपी नामे– मंगेश तेजराम राणा, वय 35 वर्ष, रा. वॉर्ड क्र. 3 देहेगाव गोसावी, वर्धा याच्या ताब्यातुन एकूण 21 देशी दारूच्या पेट्या किमती 70,560/–रू. चा माल मिळुन आला आहे. वाहनासह एकुण कि. 10,70,560/– रुपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीविरूध्द पोस्टे बोरी येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदयान्वये कार्यवाही करून पुढील कार्यवाही करीता पोस्टे बोरी यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात पोहवा गजेंद्र चौधरी, महेश जाधव, पोशि अमृत किनगे, रोहन डाखोरे यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर